

आदिनाथ चव्हाण

# गांधीवादी जलयोगी

**भवरलाल जैन यांना भारतातील सूक्ष्म सिंचनक्रांतीचे प्रणेते मानले जाते. लक्षावधी शेतकऱ्यांचे जीवन सुकर आणि सुखकर करणाऱ्या तंत्रज्ञानाचा प्रचार आणि प्रसार करणे ही तशी सोपी गोष्ट नाही; पण भवरलालजींनी ती अविरत चिकाटी आणि मेहनतीने साध्य केली. भाऊंचा उद्या (१२ डिसेंबर) पहिला स्मृती दिन. त्या निमित्त हा विशेष लेख.**

फेब्रुवारीतील ती जादूई आणि सुंदर सायंकाळ माझ्या स्मरणातून कधीच जाणार नाही. खरे तर त्या प्रसंगाचे साक्षीदार बनलेल्या हजारावर उपस्थितांची भावना हीच असेल. २०१४ मध्ये जळगावमधील जैन हिल्सवर आयोजित केलेल्या अॅग्रोवन सरपंच महापरिषदेच्या पहिल्या दिवसाचे ते अखेरचे सत्र होते. राज्यभरातून आलेले हजारावर गावांचे पुढारी तीन नामवंत उद्योजकांचे अनुभव, त्यांच्या यशाचे रहस्य जाणून घेण्यासाठी आतुरले होते. फोर्स मोटर्सचे अध्यक्ष अभय फिरोदिया, सकाळ पेपर्सचे अध्यक्ष प्रतापराव पवार आणि जैन उद्योगसमूहाचे अध्यक्ष भवरलाल जैन प्रकट मुलाखतीच्या माध्यमातून आपले अनुभव मोकळेपणाने मांडत होते. तिघांच्याही बोलण्यात अनेक धागे समान होते. त्यातला एक होता व्यावसायिक मूल्यं आणि त्यासाठी अवलंबलेल्या गांधीवादी मार्गाचा. व्यवसायात अनेक मोह, संधी खुणावत असताना गांधीवादाचा मार्ग ठामपणे आक्रमत राहणे, ही एक कसोटी असते. त्यातून जे खरे उतरतात तेच खरेखुरे गांधीवादी असतात. त्यांचे व्यवसाय काळाच्या कसोटीवर उतरत शाश्वततेचा संदेश देत राहतात. उपस्थित सरपंचांना वेगळ्याच विश्वात आल्यासारखे वाटत होते. तिघाही उद्योजकांच्या संयत अनुभव कथनाने सारे वातावरण मंत्रमुग्ध होऊन गेले होते.

शून्यातून विश्व निर्माण करणारे आणि ते करता करता लक्षावधींना समृद्धीचे वाटेकरी करणारे अनेक लाल या राकट महाराष्ट्राच्या मातीतून निपजले. यापैकी प्रत्येक उद्यमशील व्यक्तिमत्त्वांच्या प्रेरणांची आणि आकांक्षांची मुळं वेगवेगळी राहिली. त्यातून महाराष्ट्रात वेगवेगळ्या उद्यम संस्कृती आकाराला आल्या. कोणाचे उद्दिष्ट केवळ पैसा कमावणे हे होते, तर कोणाला व्यवसायवृद्धीतून व्यापक समाजहितही साधायचे होते, कोणी शहरांना आपल्या उद्योग-व्यवसायाचे केंद्रबिंदू बनवले, तर कोणी मातीशी असलेली नाळ कायम ठेवत आपल्या जन्मभूमीलाच स्वर्गवत बनवले. भवरलाल जैन हे व्यक्तिमत्त्व दुसऱ्या प्रकारातले. म्हणूनच जळगावसारख्या निमशहरी भागात सात हजार कोटींहून अधिक उलाढाल करणारा कृषी उद्योग त्यांना साकारता आला. आजच्या गळेकापू स्पर्धेच्या काळात गांधीवादाचा धागा व्यावसायिक मूल्य म्हणून स्वीकारणारे आणि तशी कार्यसंस्कृती आपल्या उद्योगसमूहात मुळापासून रुजवणारे भाऊंसारखे उद्योजक खरे तर विरळच!

भवरलालजींना भारतातील सूक्ष्म सिंचनक्रांतीचे प्रणेते मानले जाते. लक्षावधी शेतकऱ्यांचे जीवन सुकर आणि सुखकर करणाऱ्या तंत्रज्ञानाचा प्रचार आणि प्रसार करणे ही तशी सोपी गोष्ट नाही; पण भाऊंनी ती अविरत चिकाटी आणि मेहनतीने साध्य केली. हा भाग आणि जैन उद्योगसमूहाची वैश्विक भरारी खरे तर सर्वज्ञात आहे. माझ्यासारख्यांना सतत उत्सुकता राहिली ती त्यांच्या या यशामागील तत्त्वज्ञानाचा वेध आणि शोध घेण्याची. ही उत्सुकता काही प्रमाणात शमली, ती सरपंच महापरिषदेतील त्यांच्या संस्मरणीय प्रकट मुलाखतीने. शुभ्र वेशावर जाकिट परिधान केलेल्या भाऊंच्या चेहऱ्यावरील सात्विकतेचे तेज कोणालाही आकर्षून घेईल असेच होते. शांत, संयत; परंतु ठामपणे आपल्या विचारांची मांडणी करणाऱ्या भाऊंच्या वाणीत आक्रमकता किंवा आग्रहाचा जराही लवलेश नव्हता. ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व काय असते, याचा जणू ते जिता जागता नमुना होते.

आजकाल इन्क्ल्यूजिव्ह ग्रोथ (सर्वसमावेशक विकास) हा शब्द वेगवेगळ्या व्यासपीठांवर सातत्याने उच्चारला जातो. बेरोजगारीच्या राक्षसाची उंची वाढत असताना कोणताही व्यावसायिक, उद्योजक विकासाच्या या संकल्पनेकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करताना दिसतो आहे. तंत्रज्ञानाच्या आक्रमणाने अनेक परंपरागत व्यवसाय मोडीत निघत आहेत. एकविसाव्या शतकात संगणक आणि मोबाईलच्या साह्याने उदयाला आलेल्या डिसरप्टिव्ह टेक्नॉलॉजीने (ऐक्यभंग किंवा फाटाफूट करणारे तंत्रज्ञान) पारंपरिक रोजगारनिर्मितीत खूपच मोठा गोंधळ निर्माण करून ठेवला आहे. उत्तम दर्जाचे कौशल्य आणि ज्ञान असलेल्यांनाच रोजगार, व्यवसायाच्या संधी राहतील, हे नवा काळ ठासून सांगतो आहे. अशा वेळी ज्यांच्याकडे ही क्षमता नाही, अशा लक्षावधी भूमिपुत्रांचे काय, असा प्रश्न उदभवतो. नव्या व्यवस्थेत त्यांना अजिबातच स्थान उरलेले नाही; पण भाऊंनी ज्ञान-तंत्रज्ञानाचा अवलंब करताना लोकांच्या रोजगारावर गदा येणार नाही, याची काळजी काटेकोरपणे घेतली. ते म्हणत, "उद्योग क्षेत्रात माणूस, पैसा, साधनसामग्री आणि ज्ञान-तंत्रज्ञान या बाबी महत्त्वाच्या आहेत. विशेषतः ज्या घटकाला (माणसाला) सोडून तुम्ही काम करू शकत नाही, त्याला नोकर न समजता तुमचा सहव्यावसायिक समजा. त्याला कामगार समजून त्याच्यात आणि तुमच्यात दरी निर्माण करू नका.''

> “ विस्मरण करायला शिकले पाहिजे. स्मरणापेक्षा ही फार मोठी शक्ती आहे. जुन्या कटू आठवणींची गर्दी, नकारात्मकता एवढी मनात भरते की आपण पुढे जाऊच शकत नाही. जे तुम्हाला मदत करतात, त्यांना विसरू नका; मात्र तुम्ही इतरांसाठी जे जे करता ते विसरून जा. आपण एखाद्याला मदत करतो आणि परतफेडीची अपेक्षा करतो, ते चुकीचे आहे. त्याने कितीही विनवणी केली, तरी त्याला मदत करायची की नाही, याचा निर्णय आपलाच असतो. म्हणून त्याची अंतिम जबाबदारीही आपली असते, त्याची नव्हे!




सर्वसमावेशक विकास यापेक्षा वेगळा काय असू शकतो? जैन उद्योगसमूहात ही कार्यसंस्कृती रुजवण्यात भाऊंना यश आले. म्हणूनच हजारो जणांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगार देणारा हा समूह आपले वेगळेपण टिकवून अवघ्या भारतवर्षात मान उंचावून उभा आहे. जैन हिल्सवर गेलेला कोणताही माणूस मग तो शेतकरी असू द्या की व्हीआयपी, त्याला उत्तम आदरातिथ्य मिळते. सौम्य भाषेत त्याचे आगत-स्वागत केले जाते. अशोक, अजित, अनिल, अतुल हे भाऊंचे चारही कर्तृत्ववान पुत्र त्यांचा वारसा ठामपणे आणि निष्ठेने चालवत आहेत.

भाऊंनी सात हजार रुपयांच्या भांडवलात सुरू केलेला उद्योग आता सात हजार कोटींवर उलाढाल करतो आहे, हा चमत्कार आहे खरा; पण हे सारे इथेच संपत नाही. या उद्योगाच्या पायापासून शिखरापर्यंत एक धागा आहे, की जो आजही तितकाच घट्ट आहे. तो आहे गांधीवादी व्यावसायिक मूल्यांचा! खरा चमत्कार हा आहे. शॉर्टकट घेऊन वेगाने वाढण्याच्या संधी समोर असताना ठामपणे त्यापासून दूर राहणे आणि नैसर्गिक गतीने वाढणे सोपे नसते. एखादा वृक्ष ज्याप्रमाणे समप्रमाणात उभा आणि आडवाही वाढत जातो तशी ही वाढ आहे. भाऊंनी जैन हिल्सवर साकारलेले गांधी स्मारक त्यांच्या स्वतःच्या विचारांचेही जिवंत स्मारक आहे. त्यांचे चारही सुपुत्र मोठे भाऊ आपल्यातून गेले आहेत, हे मान्य करायला तयार नाहीत. भाऊंचा देह गेला असला, तरी कर्तृत्व आणि विचाररूपाने ते आपल्यातच आहेत, असे त्यांना वाटते. जैन हिल्सवर आणि या उद्योग समूहात काम करणाऱ्या प्रत्येकाचीच ही भावना आहे. एखाद्या उद्योजकाचे असे अनोखे आणि जिवंत स्मारक दुसरीकडे कोठे असेल काय?

> **“ अनेक वेळा उद्योगात विविध समस्या, संकटे आली; परंतु न डगमगता माझे प्रयत्न द्विगुणित केले. त्या प्रयत्नांतून संपत्ती निर्माण झाली. मित्रांनो, संपत्ती झाडावर येत नाही. प्रामाणिकपणा आणि मेहनत या गोष्टींचा आश्रय घेतला आणि अडचणींतून बाहेर आलो. शारीरिक आजारांना सामोरे जावे लागले; पण कष्ट थांबले नाहीत. मातीशी इमान राखलं. वाकदवरून वॉशिंग्टनपर्यंत आम्ही व्यवसायाचा विस्तार वाढवला, तरीही मूळ सोडलं नाही. आपलं गाव आणि मूळ कधीही विसरू नये.**